# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टावर्स,
नरिमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

जावक क्र.मजीप्रा/सस/तांशा.१/३५०/ 3264

दिनांक २९/७/२०००

## // परिपत्रक क्रमांक ४८ //

विषय :- भुकंपाचा झोन विचारात घेवून मृदू पोलादी सळींची मांडणी करणे बाबत.
संदर्भ :- गुण परिक्षण पथकाचे दिनांक २९/७/९९ चे परिपत्रक क्रमांक मजीप्रा/गुपप/परिपत्रक ३८०

उपरोक्त विषयानुषंगाने संदर्भीय परिपत्रकाची प्रत आपल्या सुलभ संदर्भासाठी सोबत जोडली आहे. संदर्भीय परिपत्रकामधील सूचनांचे पालन काही क्षेत्रीय कार्यालयाकडून होत नसल्याचे अधीक्षक अभियंता, गु.प.प.यांनी माझ्या निदर्शनास आणून दिले आहे. ही बाब खचितच योग्य नाही.

या अनुषंगाने आपणास निर्देशित करण्यात येते की संदर्भीय परिपत्रकामधील सूचनांचे पालन काटेकोरपणे होईल याची दक्षता घेण्यात यावी क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून सदर परिपत्रकातील सूचनांचे पालन होत नाही अशी प्रकरणे जर गु.प.प. कडून माझ्या निदर्शनास आणून देण्यात आली तर संबंधित अधिकाऱ्याना कट्टू कार्यवाहीस सामोरे जावे लागेल याची नोंद घ्यावी.

सहपत्र :- परिपत्रकाची प्रत

( राजेंद्र संगणे )
सदस्य सचिव (तांत्रिक )

प्रत,
सदस्य सचिव (प्रशासन) म.जी.प्रा.मुंबई यांचे माहितीसाठी
विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता, म.जी.प्रा. नवी मुंबई
सर्व मुख्य अभियंता, म.जी.प्रा........... माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
सर्व अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा.......... माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
सर्व कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.बा.विभाग.... माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

M. J. P.
ISSUED
-1 AUG 2000
MUMBAI-21

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

(गुण नियंत्रण कक्ष)

दूरध्वनी : ७५७ १३११
फॅक्स : ७५७ ०९६९

१ ला मजला, सिडको भवन, (दक्षिण कक्ष) बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.


क्र. मजीप्रा/गुनिक/परिपत्रक/ 380 दिनांक - २९-७-१९९९.

प्रति,

अधिक्षक अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ,
-----------------

विषय :-भूकंप-प्रवण क्षेत्राप्रमाणे सलोह कॉंक्रीटच्या बांधकामाचे संकल्पन करणेबाबत ...

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे फार मोठ्या प्रमाणावर सध्या पाणी पुरवठा योजनांची कामे चालू आहेत. सदर योजनेतील उंच टाक्या / बैठ्या टाक्या, जलशुध्दीकरण केंद्र तसेच इतर सलोह कॉंक्रीटचे कामाचे संकल्पन करताना त्यामध्ये भारतीय मानक १८९३ – १९८४ व १३९२०–१९९३ प्रमाणे भूकंप-प्रवण क्षेत्र विचारात घेऊन लोखंडी सळयांची (रिइन्फोर्समेंट) बांधकामात तरतूद केली असल्याची खात्री आपले स्तरावर करण्यात यावी.

२] सर्व कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता यांना सदर महत्वाच्या आय.एस. कोडबाबत संच आपले स्तरावर वितरीत केलेला आहे किंवा त्यासाठीची कृती चालू आहे. त्यामध्ये आय.एस.कोड १८९३–१९८४ व १३९२० – १९९३ चा समावेश आहे काय? नसल्यास, सदरचे दोन आय.एस.कोडस् सर्व कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता / सहाय्यक अभियंतांना पुरविण्यात यावेत. भूकंप-प्रवण क्षेत्रासाठी वरिल दोन आय.एस.कोडस् महत्वाची असून त्या व्यतिरिक्त गुणवत्तेच्या अथवा साहित्य चाचणीच्या दृष्टीकोनातून या कार्यालयास महत्वाची वाटणारी विविध साहित्य व पाईपांच्या आय.एस. ची यादी खालीलप्रमाणे असून सदरची आय.एस. सर्व अभियंतांना पुरविण्यात आली आहेत अथ

...२/-

याची खात्री करावी, नसल्यास त्याचा संच पुरविण्यात यावा.

| | | |
|---|---|---|
| १] | ८३२९ | डी.आय.पाईप |
| २] | १२३९ | जी.आय.पाईप |
| ३] | ५८२२ | एम.एस.पाईप लेईंग |
| ४] | १५३६ | सी.आय.पाईप |
| ५] | ७८४ | प्री-स्ट्रेसड पाईप |
| ६] | ४९८५ | पी.व्ही.सी. पाईप |
| ७] | १५९२ | ए.सी.पाईप |
| ८] | १७८६ | हाय स्ट्रेंग्थ डीफॉर्मड स्टील बार्स ॲन्ड वायर्स फॉर कॉंक्रीट रिइन्फोर्समेंट |
| ९] | ४८२ | माइल्ड स्टील ॲन्ड मिडीयम टेन्साईल बार्स |
| १०] | ३८३ | खडी |
| ११] | २६९ | ऑर्डीनरी पोर्टलॅन्ड सिमेंट |
| १२] | ४५६ | प्लेन ॲन्ड रिइन्फोर्समेंट कॉंक्रीट |
| १३] | १०५०० | स्पेसिफिकेशन फॉर ड्रिंकींग वॉटर |

भूकंप-प्रवण क्षेत्रासाठी २ सेस वर नमूद केलेले १३ असे एकूण १५ आय.एस.कोडस सर्व अभियंतांना पुरविल्यास भारतीय मानकामध्ये दिलेल्या मापदंडाप्रमाणे कामाची / साहित्याची खात्री करता येईल व निश्चितच कामाची एकंदर गुणवत्ता सुधारेल तरी वरीलप्रमाणे कृती व्हावी व तसे या कार्यालयास अवगत करणे ही विनंती.

महाराष्ट्र ... निर्गमित 20/10 1999 ... नवी मुंबई.

[ भा.मु. कांबळे ]
अधिक्षक अभियंता
गुणवत्ता परीक्षण पथक,
नवी मुंबई.

प्रत - स्वतः चे माहितीसाठी.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

## (गुणवत्ता परीक्षण पथक)

दूरध्वनी : ७५७ १३११
फॅक्स : ७५७ ०९६९

१ ला मजला, सिडको भवन, (दक्षिण कक्ष) बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.

क्र. मजीप्रा/गुपप/तांशा सा-११/५४ दिनांक: ३/२/२०००

प्रति,
अधीक्षक अभियंता [सर्व],
महा. जीवन प्राधि. मंडळ,

-------------

विषय: भूकंप प्रवण क्षेत्राप्रमाणे सलोह कॉंक्रीटच्या बांधकामाचे संकल्पन करणे बाबत व सर्व बांधकाम साहित्यांच्या चाचणी घेण्याबाबत.

संदर्भ: या कार्या. पत्र क्र. मजीप्रा/गुपप/परिपत्रक/३२०, दि. २९.७.९९

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्राने योजनेतील उंच टाक्या /बैठ्या टाक्या जलशुध्दीकरण केंद्र व इतर सलोह कॉंक्रीटचे कामामध्ये भारतीय मानक १८९३-१९८४ व १३९२०-१९९३ प्रमाणे भूकंप प्रवण क्षेत्र विचारात घेऊन लोखंडी सळ्यांची बांधकामात तरतूद केली असल्याची खात्री आपले स्तरावर करण्यात यावी असे कळविले होते. तथापि, अद्यापही या बाबीकडे काळजीपूर्वक लक्ष दिले जात नाही. तरी भारतीय मानक १३९२०/१९९३ नुसार आर.सी.सी. कामाच्या सांध्याच्या ठिकाणी सळ्यांची मांडणी केली जाते. तसेच ती ड्रॉईंगवर दाखविली जाते याची खात्री आपले स्तरावर कटाक्षाने करण्यात यावी. ही त्रुटी राहू नये यासाठी आपले स्तरावर सर्व स्तरावरील अभियंतांना दक्ष राहण्याचे आदेश निर्गमित करावेत.

त्याचप्रमाणे बांधकामासाठी वापरण्यात येणा-या सर्व साहित्यांची उदा. वाळू, सिमेन्ट, स्टिल, खडी, पाईप, विटा यांची बांधकामासाठी वापरणेपूर्वी चाचण्या घेऊन ते योग्य असलेची खात्री केल्यानंतर वापरणे योग्य आहे. परन्तु तशी वस्तुस्थिती नाही असे दिसून येते.

तरी आपल्या अधिपत्याखालील सर्व अभियंत्यांना आपले स्तरावर याबाबत दक्ष राहण्याचे आदेश देणेत यावेत.

वरील प्रकारच्या त्रुटी राहू नयेत यास्तव, या कार्यालयाच्या पत्र क्र. गुपप/तांशा/सा-३०/३१७, दि. २८.७.९९ अन्वये महत्वाच्या भारतीय मानकाचा संच सर्व

[ कृ. मागे पहा... ]

(115)

स्तरांतील अभियंत्यांना उपलब्ध करून देण्यासाठी कळविण्यात आले होते. तरी याबाबतचा कृती अहवाल या कार्यालयास त्वरित पाठवावा, ही विनंती.

[ भा. तु. कांबळे ]
अधीक्षक अभियंता,
गुणवत्ता परीक्षण पथक, नवी मुंबई.

प्रत:

१. सदस्य सचिव [ प्र. व अ. ], महा. जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईन्ट, मुंबई ४०० ०२१ यांना माहितीसाठी सविनय सादर.

२. सदस्य सचिव [तांत्रिक], महा. जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईन्ट, मुंबई ४०० ०२१ यांना माहितीसाठी सविनय सादर.